# प्रास्ताविक

# प्रास्ताविक

१९६० नंतर मराठी साहित्याच्या क्षेत्रामध्ये वेगवेगळे वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले. यामध्ये ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, जनवादी, विज्ञानवादी इत्यादी साहित्य प्रवाहांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. यापैकी ग्रामीण साहित्याच्या निर्मितीच्या प्रारंभापासून विचार करता ग्रामीण साहित्याला सामान्यत: प्रस्थापित मराठी साहित्याचे जास्त आकर्षण होते असे दिसते. कारण प्रस्थापित मराठी साहित्याच्या ज्या प्रेरणा होत्या त्याच कमी जास्त फरकाने ग्रामीण साहित्याच्या असल्याचे अनुभवास येते. सामान्यत: ग्रामीण जाणीव ही ग्रामीण समाज आणि संस्कृतीशी निगडित असते. ग्रामीण शेती, निसर्ग आणि त्यावर विसंबून असणारा ग्रामीण समाज त्यांच्या रूढी, परंपरा, धर्म, जात, व्यवसाय यांच्या अनुबंधांनी ग्रामीण संस्कृतीचे नियमन केलेले असते. शेतीशी निगडित पुरक व्यवसाय, बारा बलुतेदार पद्धती आणि अलुतेदार पद्धती यांच्या अंतर्गत संबंधांनी ग्रामीण समाजाचे व्यवहार निर्बंधित केलेले असतात. जातीनिष्ठ व्यवसाय त्यातून त्या समूहाच्या जातीनिष्ठ रूढी, परंपरा, राहणीमान, खाणे-पिणे आणि भाषिक व्यवहार नियंत्रित केलेले असतात. त्यामुळे शेती व्यवसायाला जोडून साकारलेला गावगाडा, गावकुसाच्याआतील सामाजिक व्यवहार आणि गावकुसाच्याबाहेरील सामाजिक व्यवहाराबरोबरच भटके-विमुक्त आणि आदिवासी समाज असा व्यापक स्वरूपाचा ग्रामीण जाणिवेचा परीघ व्यापलेला असतो, म्हणजेच ग्रामीण जाणिवेची कार्यकक्षा केवळ गावकुसाच्या आतील सामाजिक समूह इतपत निर्बंधित करता येत नाही. तर गावकुसाच्या बाहेर असलेला अस्पृश्य समाज, भटक्या, विमुक्त आणि आदिवासी जमाती यांच्या जीवन व्यवहाराशी निगडित असते. मात्र ग्रामीण जाणिवेची ही व्यापकता विचारात घेऊन ग्रामीण साहित्याचा परामर्श घेताना हे साहित्य केवळ गावकुसाच्या आतील सामाजिक समूह आणि शेती निसर्गाशी त्याचे जोडलेले नाते या मर्यादांनी अंकित झाल्यामुळे गावकुसाबाहेरच्या जीवन जाणिवा अभिव्यक्त होऊ शकल्या नाहीत.

गावकुसाच्या आतील जाती समूहाचे वर्गीकरण करता त्यात उच्च व कनिष्ठ जातीय समूहांचा अंर्तभाव होतो. उच्च जाती विशेषत: शेतीवरील मालकी हक्क असणाऱ्या

आहेत. अपवादानेच यामध्ये शेतमजुरांचा अंतर्भाव होतो. गावकुसाच्या आतील कनिष्ठ जाती शेती व्यवसायाला पूरक ठरणाऱ्या व्यवसायाशी निगडित असतात. सामान्यत: धार्मिक कार्य, शेती अवजारे, पशुपालन, दैनंदिन वापराच्या मातीच्या वस्तू, अलंकार आभूषणे, केशकर्तन, लोक संस्कृतीचे उपासक इत्यादी जातींचा यात अंतर्भाव होतो. या कनिष्ठ जातीकडे शेतीबरोबरच कारागिरी आणि धार्मिक उपासणांचे माध्यम हातात असल्याने बलुत्याच्या रूपाने त्यांना मिळणारी बिदागी श्रेष्ठत्त्वाचा अंगीकार करणारी असते. त्यामुळे गावकुसाच्या आत असलेल्या वरिष्ठ जाती आणि पूरक व्यावसायिक त्यांना धर्म वर्ण आणि जाती निर्बंधाच्या अनुषंगाने श्रेष्ठत्त्व आलेले असते. अशा या गावकुसाच्याआतील सामाजिक समूहाचे नेतृत्व अथवा त्यांच्या जीवन-जाणिवा ग्रामीण साहित्याने प्रमाणित केलेल्या दिसतात.

१९६० नंतरच्या ग्रामीण साहित्याच्या प्रेरणांचा विचार करता त्या साहित्याने प्रस्थापित मराठी साहित्याच्या प्रेरणांचे अनुकरण करण्यामागील कारण जाती श्रेष्ठत्त्वाशी निगडित असल्याचे दिसून येते. गावकुसाच्याआतील श्रेष्ठ व कनिष्ठ जाती समूह बेटी व्यवहार करत नसले तरी स्थूलमानाने येथे रोटी व्यवहार घडताना दिसतो. पर्यायाने वर्णाश्रम धर्माच्या नियमाप्रमाणे ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या जाती समूहाची संस्कृती गावकुसाच्या आत नांदताना दिसून येते. प्रस्थापित मराठी साहित्य ज्या नागर जाणिवा अभिव्यक्त करते, तो नागर समाज ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या वर्णांशी निगडित असल्यामुळे त्याचे सामाजिक अनुबंध आणि गावकुसाच्या आतील सामाजिक समूहाचे अनुबंध वर्णाश्रम धर्माप्रमाणे समसमान असल्याचे दिसून येते. परिणामत: ग्रामीण साहित्याने प्रस्थापित नागर साहित्याच्या प्रेरणा का स्वीकारल्या? याचे उत्तर वर्ण आणि जातिश्रेष्ठत्त्वाच्या समान रूढी-परंपरामध्ये दडले असल्याचे दिसून येते. त्यामुळे पांढरपेशा वर्गाला, वाचकाला आवडेल असेच विषय ग्रामीण साहित्यात हाताळले गेले. मात्र ग्रामीण जीवनाशी निगडित असणाऱ्या दलित समाजाचे चित्रण ग्रामीण साहित्यात येऊ शकले नाही. दलित वर्गांनी जी वर्षानुवर्षे दु:ख, वेदना अनुभवली त्याचे चित्रण होऊ शकले नाही. गावकुसाबाहेरील विविध जाती-जमातींचे त्यांच्या प्रश्नांना म्हणावे तितक्या प्रमाणात ग्रामीण साहित्यातून न्याय मिळाल्याचे दिसून येत नव्हते.

वस्तुत: १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महात्मा जोतिबा फुले यांनी 'सत्यशोधक चळवळी'च्या माध्यमातून शेतकरी आणि गावकुसाबाहेरील अस्पृश्यांच्या अन्यायाविरूद्ध आवाज उठविला. 'शेतकऱ्यांचा असूड' लिहून शेतकऱ्यांच्या वरील होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली आणि ग्रामीण आणि दलित असे दोन्हीही प्रश्न यशस्वीपणे हाताळण्याचा प्रयत्न केला. पण महाराष्ट्रातील ग्रामीण दलित चळवळीचा, चर्चेचा, त्यातून निर्माण झालेल्या प्रश्नांचा आणि साहित्यात उमटलेल्या प्रतिबिंबाचा विचार करता असा निष्कर्ष निघतो की, दलित चळवळ ही ग्रामीण असू शकते पण ग्रामीण चळवळ ही दलित चळवळ असेलच असे नाही कारण ग्रामीण चळवळीचा प्रारंभ आणि केंद्रबिंदू हा नागर जाणिवेशी निगडित असल्याचे दिसून येते.

१९६० नंतर फुले-शाहु-आंबेडकर या विचारवंताच्या परिवर्तणीय विचारांचा वारसा आत्मसात करून साहित्याच्या क्षेत्रामध्ये झेप घेण्याचा प्रयत्न केला. चळवळीच्या माध्यमातून वर्ण व जातीची बंदिस्त कोंडी फोडून दलित साहित्याचा सवते सुभा निर्माण केला. दलित साहित्यात चित्रित होणारा समाज हा ग्रामीण परिघाशी संलग्न असाच होता. त्यामध्ये ग्रामीण परिघातील गावकुसाबाहेरील जनतेचे प्रश्न दलित साहित्याने उठावदारपणे मांडले. दलित साहित्याच्या माध्यमातून आपले उद्दिष्ट, स्वरूप, फलित प्रकट केले. वास्तविक पाहता महाराष्ट्रामध्ये ग्रामीण-दलित साहित्याची सुरुवात म.फुले यांच्यापासून झाली असली तरी खऱ्या अर्थाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून आणि क्रांतिकारक विचारातून दलित समाजाने अंधारात धडपडणाऱ्या समाजाची अस्मिता जागृत केली. दलित समाजाचे जे दु:ख, दैन्य, भूक, लाचारी, अगतिकता, अंधश्रद्धा हे प्रश्न आहेत तेच आदिवासी समाजाचे आहेत. आणि म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना प्रेरणा मानून आधुनिक मराठी साहित्यात एक नवी तत्त्वप्रणाली उदयाला आली. ती म्हणजे ग्रामीण-दलित-आदिवासी अशा त्रयीचे चित्रण करणारे साहित्य निर्माण झाले. आपल्या या साहित्यकलाकृतीतून प्रामुख्याने राग, क्षोम, विद्रोह, नकार, संताप, चीड, बंड व्यक्त करण्याचा मनोदय साहित्यिकांनी केला. पण त्याचबरोबर प्रज्ञा, शील, करुणा, मानवतावाद, नवीन जीवनमूल्ये महत्त्वाची मानली व आपल्या वाङ्मयकृतीतून स्वत:चे तत्त्वज्ञान निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

१९७० ते ८० या कालखंडात ग्रामीण जीवनाबरोबर दलित समाजातही स्थित्यंतर होऊ लागले. ग्रामीण-दलित सीमारेषेवरती साहित्य लिहिणारा साहित्यिक वर्ग या कालखंडामध्ये निर्माण होऊ लागला. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यानी ग्रामीण आणि दलित साहित्यातील फरकाविषयी आपले मत व्यक्त करताना म्हणतात, "ग्रामीण आणि दलित साहित्यात फरक असला तरी, दलितांना जिथे संघर्ष करावा लागतो ते 'कुरुक्षेत्र' जर ग्रामविभाग असेल तर ते साहित्य निदान ग्रामीण साहित्याच्या सीमारेषेवरचे साहित्य आहे असे म्हणावयास हरकत नाही. याचाच अर्थ असा की, ग्रामीण भागातील दलितांना केवळ जातीय पातळीवरील संघर्ष द्यावा लागतो असे नाही, तर सबंध ग्रामव्यवस्थेशीच संघर्ष करावा लागतो. म्हणून अशा संघर्षाचे 'कुरुक्षेत्र' शेवटी ग्रामविभागच असते!"[१] नागनाथ कोत्तापल्ले यांनी दलित ग्रामीण साहित्याच्या सीमारेषा मांडताना दलित साहित्याचे 'कुरुक्षेत्र' ग्रामीण असल्याचा मुद्दा चर्चिला आहे. त्या आधारावरती दलित साहित्य हे ग्रामीण सीमेवरती केंद्रित असल्याचा युक्तिवाद ते करतात. वस्तुत: नागनाथ कोत्तापल्ले यांची ही भूमिका वस्तुनिष्ठ नाही. कारण ग्रामीण समूह अनेक जाती-जमातीमध्ये विभाजित झालेला आहे. प्रत्येक जातीची एक संस्कृती रूढ झालेली आहे. जातीनिरूप व्यवसाय निहित झालेला असून जात निर्बंधित कर्मसिद्धांत नाकारण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे दलित साहित्याचा संघर्ष एकूणच पारंपरिक व्यवस्थेच्या विरोधी आहे. म्हणजेच ग्रामीण साहित्याचे 'कुरुक्षेत्र' पारंपरिक व्यवस्था असून त्या व्यवस्थेचा एक घटक ग्रामीण परिसर आहे. तात्पर्य आनंद यादव यांनी दलित साहित्य हे ग्रामीण परिघातच मोडत असल्यामुळे त्याला वेगळे साहित्य मानण्याची आवश्यकता नाही. अशी जी भूमिका मांडली होती. त्या भूमिकेचे सुधारित रूप म्हणजेच नागनाथ कोत्तापल्ले यांची वरील भूमिका होय. वस्तुत: दलित जाणीव, त्या जाणिवेचे वेदना, विद्रोह आणि नकार आणि मानवतावादाचा स्विकार हे स्वतंत्र मूल्यव्यवस्था स्थापित करण्यासाठी संघर्ष केला जातो आहे. तो संघर्ष केवळ ग्रामीण कुरूक्षेत्रावर केला जात नाही तर तो संघर्ष मानसिक पातळीवर केला जातो. म्हणूनच बाबुराव बागूल 'मला मनूने मारले' असे विधान त्या अर्थानेच करतात याचाच अर्थ असा की, दलित व्यक्ती ग्रामीण परिसरात राहिली किंवा शहरात वास्तव्याला गेली तरीही त्याचा

जातीव्यवस्थेशी असणारा संघर्ष कायम असतो. ग्रामीण-दलित सीमारेषेवरती लिखाण करणारा जो साहित्यिक वर्ग उदयाला आला त्यांचा हेतू हा प्रामुख्याने ग्रामीण भागातील दलित तसेच सामाजिक जीवनाचा वेध घेणे हा होता. त्यांनी आपल्या साहित्यातून दलित समाजाबरोबर झोपडपट्टीतील किळसवाणी जीवन, विदारक वास्तव अनुभवावर प्रकाश टाकलेला दिसतो. ग्रामीण भागामध्ये नवस-सायास, देवधर्म, अंधश्रद्धा यांचे असलेले स्थान, त्यामुळे निर्माण झालेली मानसिकता याचे चित्रण होऊ लागले. स्वार्थी राजकारण, त्याला बळी पडलेली दलित जनता, दलित वस्त्यांमध्ये दिसून येणारा बौद्ध व बौद्धत्तर संघर्ष याचे प्रभावीपणे चित्रण करण्याचा लेखकांचा कल दिसून येतो. गावगाड्याशी संबंधित असणाऱ्या गावकुसाबाहेरच्या वर्गाला दु:ख, दारिद्र्य, अपमान, भूक यासारख्या पाचवीला पुजलेल्या समस्येचे चित्रण संवेदनशील पातळीवर होताना दिसते.

ग्रामीण साहित्याचा आणि दलित साहित्याचा विचार करता आधुनिक काळात ग्रामीण-दलित या दोन्ही सीमारेषा एकमेकात मिसळल्याचे दिसते. दलित आणि ग्रामीण अशा जाणिवा व सहजाणिवांची मांडणी करणारी नवी पिढी या सीमेवर वावरतांना दिसते. ग्रामीण-दलित जीवनाची सरमिसळ करणाऱ्या कथा निर्माण करणारा मोठा साहित्यिक वर्ग झालेला दिसतो.

१९७० पूर्वीच्या कालखंडाचा मागोवा घेतल्यास असे जाणवते की, दलित कथेच्या विकासाच्या वाटचालीत तुकाराम अंबादास पुरोहित, ना.रा.शेंडे, बंधुमाधव, अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात इत्यादी लेखकांनी मोलाची भर घातली. अस्पृश्य समाजात जन्मलेल्या या लेखकांनी समाजजीवनातील विविध जीवनानुभव आपल्या साहित्यातून मांडले. त्यांच्या कथेमधून त्यांनी भूकेसारख्या प्रश्नांबरोबर अज्ञान, अंधश्रद्धा, दैन्य, अवहेलना, अमानवीवृत्ती हाताळण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या कथेमध्ये दलितांची वेदना व्यक्त झालेली दिसून येते. याच काळात ग्रामीण साहित्य प्रवाहातील कथा वाङ्मयाचा विकास होत होता. ग्रामीण जीवनातील वास्तव मांडताना त्यांनी दलित जीवनापासून अलिप्तता बाळगली असल्याचे दिसते. गावकुसाच्या आतील ग्रामीण समाज हे त्यांच्या कथेचे मुख्य सूत्र दिसते.

त्यामध्ये आनंद यादव, शंकर पाटील, रा.र.बोराडे यांचे कथा लिखाण महत्त्वाचे आहे. त्यांच्या कथेतील आशय गावगाड्याशी संबंधित असले तरी गावकुसाबाहेरील अस्पृश्यांचे चित्रण करताना त्यात विद्रोहापेक्षा सहानुभूतीचे सूर उमटलेला दिसून येतो.

१९७० ते १९८० या कालखंडानंतर ग्रामीण आणि दलित या प्रांतात वावरणाऱ्या कथाकारांनी समग्र ग्रामीण जीवन कथेच्या केंद्रस्थानी आणले आहेत. प्रामुख्याने ग्रामीण जीवनातील दलित वेदनेचा अनेक प्रवाही आविष्कार बाबुराव बागूलांच्या रूपाने साकारला जात होता. त्यांच्या कथेत दलितांबरोबर पारंपरिक व्यवस्थेचा बळी पडलेल्या ग्रामीण समाजाची मानसिक गुलामगिरी व्यक्त झाली आहे. धर्म, जात आणि अंधश्रद्धा यांनी पोखरलेल्या समाजाचे मूलभूत प्रश्न अभिव्यक्त केले. त्यामुळे त्यांच्या कथेत ग्रामीण, दलित आणि आदिवासी समूहाच्या वेदना साकार होऊ लागल्या. याच प्रवाहातून पुढील काळात ग्रामीण व दलित या सीमारेषा अस्पष्ट होत गेलेल्या दिसून येतात.

या कालखंडामध्ये ग्रामीण परिसरामध्ये सामाजिक जीवनात म.फुले, डॉ.आंबेडकर आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या तत्त्वज्ञानांनी प्रवाहित झालेली नवीन पिढी उदयाला येऊ लागली. या तत्त्वज्ञानांचा अवलंब करणाऱ्या या पिढीने ग्रामीण समाजाला 'बहुजन' हे विशेषण अंगिकारले. 'बहुजन' या व्याख्येमध्ये प्रामुख्याने ग्रामीण-दलित-आदिवासी आणि कष्टकरी वर्गाचा अंर्तभाव होऊ लागला. त्यामुळे या प्रवाहाखाली कथालेखन करणारा दलित, ग्रामीण वाङ्मयीन प्रवाहातील कथाकार ग्रामीण दलित सीमारेषा दूर करून दोन्ही परिघातील जीवन जाणिवा अभिव्यक्त करताना दिसतात. त्यापैकी वामन होवाळ आणि भास्कर चंदनशिव यांचा आवर्जुन तर याच परंपरेतील एक तरूण कथाकार विलास सिंदगीकर यांचा विशेषत्वाने निर्देश करता येईल.

- **वामन होवाळ :**

वामन होवाळ हे दलित साहित्यातील वेगळ्याच वाटेने वाटचाल करणारे साहित्यिक आहेत. स्वत: दलित जीवन जगलेल्या वामन होवाळांनी दलित जीवनातील व्यथा व वेदना पाहिल्या व भोगल्या तसेच ग्रामीण जीवनात दलितांच्यावर सवर्णांचा होणारा अन्याय

याचे चित्रण त्यांनी कथेच्या माध्यमातून केले आहे. त्यांचा 'बेनवाड' हा पहिला कथासंग्रह १९७३ मध्ये प्रकाशित झाला. या कथासंग्रहातील काही कथा ग्रामीण आहेत तर काही दलित आहेत. वसुली, कुरघोडी, हिसका, दौलतजादा या कथा ग्रामीण आहेत तर देव घावला! देव पावला!, पायताणाचा उतारा, मजल्याचं घर या कथा दलित वर्गाचे चित्रण करणाऱ्या आहेत. खेड्यामध्ये सवर्ण आणि दलित असा जातीय भेद असला तरी बलुतेदार पद्धतीमुळे दलित व सवर्ण लोकांचे रोजचेच व्यवहार होत असतात. याचे चित्रण मजल्याचं घर दौलतजादा, साखरेचं खाणार या कथेमधून झाले आहे. वामन होवाळांचे 'यळकोट' (१९८२) आणि 'वारसदार' (१९८६) हे कथासंग्रह प्रामुख्याने मानवी जीवनातील विसंगतीचे चित्रण करताना दिसतात. वामन होवाळ आपल्या कथेतील माणसे रेखाटताना विनोदी शैलीचा वापर करताना दिसतात.

- **भास्कर चंदनशिव :**

ग्रामीण जीवनाचा समग्रपणे विचार करणारे भास्कर चदनशिव हे लेखक आहेत. त्यांच्या कथेमध्ये ग्रामीणता आणि दलित जीवन हे एकमेकात सरमिसळ झाल्याचे दिसून येते. त्यांनी आपल्या कथेमधून ग्रामीण जीवनातील तसेच दलितांच्या जीवनातील अगतिकता, हतबलता याचे चित्रण केले आहे. भास्कर चंदनशिव यांचा 'जांभळढव्ह' हा १९८० मध्ये प्रकाशित झालेला पहिला कथासंग्रह आहे. तर 'मरणकळा' (१९८३) मध्ये प्रकाशित झाला. त्यांच्या कथेतील केंद्रबिंदू ग्रामीण भागातील तळागाळातील शोषित वर्ग, दारिद्र्य, विषमता आहे, आणि त्यातून निर्माण होणारा उद्रेक ही आहे. ग्रामीण भागामध्ये जोपासल्या जाणाऱ्या अंधश्रद्धा, दारिद्र्य, अज्ञान याचे चित्रण 'जांभळढव्ह' या कथासंग्रहातील आग, पीळ, भूक, मसणवाटा, पाणी इत्यादी कथांमधून पाहावयास मिळते. 'पाणी' या कथेतून पाण्याच्या निमित्ताने निर्माण झालेला संघर्ष याचे चित्रण आहे. त्यांची कथा दलित व सवर्ण आहे. चंदनशिव यांची कथा ग्रामीण जीवनाबरोबर अलुतेदार-बलुतेदार मधील दलित समाजाचे चित्रण करते.